| | | | | |
|---|---|---|---|---|
| दाखल तारीख | ०५.०५.२०१२ | | | |
| नोंदणी तारीख | ०५.०५.२०१२ | | | |
| निकाल तारीख | १६.०३.२०२६ | | | |
| कालावधी | वर्ष | महिना | दिवस | |
| | **१३** | **१०** | **११** | |

<u>मुख्य न्यायदंडाधिकारी, कोल्हापूर यांचे न्यायालयात</u>

(**पीठासीन अधिकारी एम. एम. गादिया**)

<u>नियमित फौजदारी खटला क्र.४७९/२०१२.</u>

**<u>CNR No. MHKO030019972012.</u>** **<u>निशाणी क्र.७१/ब.</u>**

<u>गुन्हा क्रमांक २०/२०१०.</u>

**महाराष्ट्र शासन तर्फे जुना राजवाडा**
**पोलीस ठाणे, कोल्हापूर.** | **.. अभियोग पक्ष**

*<u>विरुध्द</u>*

१. **माणिक लालचंद गांधी,**
वय ४७ वर्षे, धंदा – मजुरी,

२. **मोहन लालचंद गांधी,**
वय ४१ वर्षे, धंदा – ब्रोकर,

३. **वीणा माणिक गांधी,**
वय ४२ वर्षे, धंदा – घरकाम,

**..आरोपी**

| | | |
|---|---|---|
| ४. **महेश बाळकृष्ण भाकरे,**<br>वय ४७ वर्षे, धंदा – नोकरी,<br>५. **पुजा महेश भाकरे,**<br>वय ४७ वर्षे, धंदा – घरकाम,<br>६. **सदानंद विलास बडवे,**<br>वय ४५ वर्षे, धंदा – ब्रोकर,<br>सर्व रा. १०२, बी वॉर्ड, द्रविड बोळ,<br>महाद्वार रोड, कोल्हापूर. | | **..आरोपी** |

.....................................................................................................

अभियोगपक्षातर्फे सरकारी अभियोक्ता – श्री. ए. एन. डोईफोडे.
आरोपी क्र.१ ते ३ तर्फे विधीज्ञ – श्री. एस. जी. कुलकर्णी
आरोपी क्र.४ ते ६ तर्फे विधीज्ञ – श्री. पी. एस. कावणेकर

.....................................................................................................

## न्यायनिर्णय

( दिनांक १६.०३.२०२६ )

प्रस्तुत खटल्यात भारतीय दंड संहीता, १८६० मधील कलम १९३, ३४२, ४६७, ४६८, ४७१, ४२०, ३२३, ५०४, ५०६, ४०९, व ५११ सह कलम ३४ खालील गुन्ह्यांसाठी दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले आहे.

**०२.**अभियोगपक्षाची थोडक्यात हकिकत अशी की, फिर्यादीने दिनांक १७.०७.२००९ व २०.०७.२००९ रोजीच्या खरेदीखताआधारे कोल्हापूर येथील प्रभाग ब मधील न.भु.क्र.७७/१, ७७/२, व १८९/१ या मिळकती मुळ मालक

वसंत बाळकृष्ण जोशी व अरुण बाळकृष्ण जोशी यांच्याकडून रुपये ६५,५०,१०१/– या मोबदल्यापोटी खरेदी केली आहे, व सदर मिळकतींचा कब्जाही घेतला. सदर व्यवहारामध्ये आरोपी क्र.१ हा मध्यस्थ व दलाल होता. त्यानंतर दिनांक २९.०५.२००७ व ०२.०२.२००८ रोजीच्या अनुक्रमे साठेखत व खरेदीखताआधारे मुळ मालक वसंत जोशी याच्याकडून आपल्या नावे वटमुखत्यारपत्रासह सदरचे बनावट दस्त तयार केले, व तसेच बनावट कब्जा पावतीही तयार केली. आरोपी क्र.१ याने इतर आरोपींच्या मदतीने सदर मिळकतींबाबत खोटी कब्जा पावती, भाडेपट्टा व इतर कागदपत्रे दिनांक २३.०१.२००९ रोजी तयार करुन घेतली. याबाबत फिर्यादीने दिनांक १५.०९.२०१० रोजी न्यायालयात फिर्याद दाखल केली. सदर फिर्यादवरील फौजदारी प्रक्रिया संहीता, १९७३ मधील कलम १५३(३) अन्वये झालेल्या तपासाच्या आदेशावरुन, आरोपींविरुध्द वर नमूद गुन्ह्यांसाठी २०/२०१० या क्रमांकाने जुना राजवाडा पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली. सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान, घटनेत आरोपींचा समावेश असल्याचे स्पष्ट झाल्याने, त्यांना अटक करण्यात येवुन, तपासांती, त्यांच्याविरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

**०३.**माझ्या विद्वान पुर्वाधिका–यांनी दोषारोप(नि.२८) तयार केला आहे. सदर दोषारोपातील सर्व मजकुर आरोपींना त्यांच्या मायबोलीत वाचून व समजावुन सांगण्यात आला असता, त्यांनी गुन्हा नाकबुल केला व चौकशीची मागणी केली. बचावादरम्यान, आरोपींनी अभियोगपक्षाची सर्व हकिकत नाकारुन त्यांना खोट्या गुन्ह्यात गोवण्यात आल्याचे नमूद केले आहे.

**०४.**वादप्रश्न व त्यावरील माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत,

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
| --- | --- | --- |
| १. | आरोपींनी त्यांच्या सामाईक हेतुने, विशेष दिवाणी दावा क्र.२२१/२०१० व नियमित दिवाणी दावा क्र.१७६/२०१० चे कामी न्यायालयात उद्देशपुर्वक खोटा पुरावा दिला, हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | **... नाही.** |
| २. | आरोपींनी त्यांच्या सामाईक हेतुने, फिर्यादीस जोतीबा रोड, कोल्हापूर येथील सिटी सर्व्हे नंबर ७७/१ व ७७/२ व १८९ येथे गैरपणे परिरुध्द केले, हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | **... नाही.** |
| ३. | आरोपींनी त्यांच्या सामाईक हेतुने, फिर्यादीची फसवणुक करण्यासाठी खोट्या व बनावट कागदपत्रांचा वापर केला, हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | **... नाही.** |
| ४. | आरोपींनी त्यांच्या सामाईक हेतुने, फिर्यादीची फसवणुक करण्याकरीता खोटी व बनावट मुल्यवान कागदपत्रे तयार केली, हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय | **... नाही.** |
| ५. | आरोपींनी त्यांच्या सामाईक हेतुने, फिर्यादीची फसवणुक करण्यासाठी खोट्या व बनावट कागदपत्रांचा वापर केला, हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | **... नाही.** |

| | | |
|---|---|---|
| ६. | आरोपींनी त्यांच्या सामाईक हेतुने, फिर्यादीच्या नावाने असलेल्या वर नमूद मिळकतींबाबत वर नमूद खोटे व बनावट दस्तऐवज तयार करुन त्याची फसवणुक केली, करुन तोतयेगिरी करुन फिर्यादीची ठकवणुक केली, हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | ... **नाही.** |
| ७. | आरोपींनी त्यांच्या सामाईक हेतुने, फिर्यादीस इच्छापुर्वक दुखापत केली, हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय | ... **नाही.** |
| ८. | आरोपींनी त्यांच्या सामाईक हेतुने, फिर्यादीस प्रक्षोभीत करुन सार्वजनिक शांततेचा भंग होण्याच्या उद्देशाने तसेच इतर कोणताही अपराध घडावा, या उद्देशाने अपमान केला, हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | ... **नाही.** |
| ९ | आरोपींनी त्यांच्या सामाईक हेतुने, फिर्यादीस दुखापत करणेची धमकी देवुन धाकधपटशा दिला, हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय? | ... **नाही.** |
| १० | आरोपींनी त्यांच्या सामाईक हेतुने, मुखत्यार नात्याने फिर्यादीच्या वर नमूद मिळकतीबाबत फौजदारीपात्र न्यासभंग केला, हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय? | ... **नाही.** |

| | | |
|---|---|---|
| ११ | आरोपींनी त्यांच्या सामाईक हेतुने, आजन्म कारावासाच्या शिक्षेस पात्र असणारा गुन्हा केला अथवा करण्याचा प्रयत्न केला, हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय? | **... नाही.** |
| १२ | काय आदेश ? | **...आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात आलेले आहे.** |

## कारणमीमांसा

**०५.**दोन्ही बाजुच्या विव्दान वकिलांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. हकिकतीच्या पुष्टर्थ, अभियोगपक्षाने केवळ फिर्यादीची साक्ष(नि.४९)घेतलेली आहे.

**वादप्रश्न क्र.१ ते ११ करिता,**

**०६.**सदर वादप्रश्न हे परस्परांशी निगडीत असल्यामुळे, सदर वादप्रश्नांचे विश्लेषण सोईसाठी एकत्रीतपणे करण्यात येत आहे. फिर्यादीने आपल्या साक्षीत(नि.४९) असे नमूद केले आहे की, आरोपी क्र.१ व २ हे त्याचे जवळचे नातेवाईक आहेत, तसेच ते स्थावर मिळकत दलाल आहेत. आरोपी क्र.३ ही आरोपी क्र.१ ची पत्नी आहे. आरोपी क्र.४ व ५ यांना त्याने प्रत्यक्षात पाहीलेले नाही, परंतु तो त्यांना ओळखतो. त्याने आरोपी क्र.१ व २ यांच्या मदतीने कोल्हापूर येथील प्रभाग 'ब' मधील न.भु.क्र.७७/१, ७७/२ व १८९ या मिळकती मुळ मालक वसंत बाळकृष्ण जोशी व अरुण बाळकृष्ण जोशी यांच्याकडून खरेदी घेतलेल्या होत्या, तसेच सदर मिळकतींचा त्यास कब्जाही मिळालेला होता. तो कोल्हापूरात आलेला असताना, आरोपींनी त्यास येवु दिले नाही, तसेच नेहमी धमक्या दिल्या. म्हणून त्याने जुना राजवाडा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. आरोपींना त्याच्या मालमत्ता गिळंकृत करावयाच्या असल्यामुळे ते तसे वागत होते. आरोपी हे सन २०१० व

त्यापुर्वीपासून त्यास धमक्या देत होते. आरोपींनी त्याच्या मालमत्तेबाबत खोटे दस्तऐवज तयार केले, तसेच मुळ मालकास त्यांनी दिलेली मोबदला रक्कमही स्वतः स्वीकारली. त्याने आपल्या उलटतपासात असे नमूद केले आहे की, आरोपी क्र.४ ते ६ यांना त्याने खटला दाखल झाल्यानंतरच पाहीलेले आहे, तसेच सदर आरोपींनी त्यास कोणताही त्रास व धमक्या दिलेल्या नव्हत्या.

**०७**.फिर्यादीने आपल्या सरतपासात(नि.४९),आरोपींनी काय स्वरुपाच्या धमक्या त्यास दिलेल्या होत्या, तसेच त्यांनी त्याच्या मिळकतींबाबत कोणती कागदपत्रे बनावट तयार केली, याचा उल्लेख केलेला नाही. अभियोगपक्षाने फिर्यादीच्या मालकीच्या कथीत वर नमूद मिळकतींबाबत कोणतीही कागदपत्रे शाबीत केलेली नाहीत. फिर्यादीच्या पुराव्यात सुध्दा सदर कागदपत्रांचा स्पष्ट उल्लेख नाही. अभियोगपक्षाने कथीत बनावट कागदपत्रांबाबत कोणताही इतर पुरावा न्यायालयासमोर आणलेला नाही. फिर्यादीची सर्व कथने मोघम आहेत, व ती तपशिलवार नाहीत. परिणामतः आरोपींनी फिर्यादीच्या कथीत मिळकतींबाबत खोटी व बनावट कागदपत्रे तयार केली, खोटी व बनावट मुल्यवान दस्तऐवज तयार केले, सदर बनावट दस्तऐवज फिर्यादीची फसवणुक करण्यासाठी तयार करण्यात आले, त्यास सदर दस्तऐवज हे बनावट असल्याची जाणीव असूनही, त्यांचा वापर केला, त्यांनी त्यांचा फौजदारीपात्र विश्वासघात केला, किंवा वर नमूद गुन्हे करण्यासाठी प्रयत्न केला, त्यांनी त्यास फौजदारीपात्र अटकाव केला, इच्छापुर्वक दुखापत केली, व फौजदारीपात्र धाकधपटशा दिला, हे योग्य संशयविरहीतपणे शाबीत झालेले नाही. म्हणून आरोपींविरुध्दचे भारतीय दंड संहीता, १८६० मधील कलम १९३, ३४२, ४६७, ४६८, ४७१, ४२०, ३२३, ५०४, ५०६, ४०९, व ५११ सिध्द झालेले नाहीत. म्हणून वादप्रश्न क्र.१ ते ११ चे निष्कर्ष नकारार्थी असे आहेत.

**<u>वादप्रश्न क्र.१२ बाबत</u> :–**

**०८.**मी वादप्रश्न क्र.१ ते ११ ला दिलेल्या नकारार्थी निष्कर्षांचा विचार करता, आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. परिणामतः वादप्रश्न क्र.८ चे निष्कर्षादाखल, मी खालील आदेश पारित करित आहे,

## <u>आदेश</u>

१. आरोपींना भारतीय दंड संहीता, १८६० मधील कलम १९३, ३४२, ४६७, ४६८, ४७१, ४२०, ३२३, ५०४, ५०६, ४०९, व ५११ खालील गुन्ह्यांतुन फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम २४८(१) नुसार गुन्ह्यातून निर्दोष मुक्त करण्यात आले आहे.

२. आरोपींचे जामिनकतबे रद्द करण्यात येवुन, त्यांना स्वातंत्र्य बहाल करण्यात आले आहे.

४. फौजदारी प्रक्रिया संहीता, १९७३ मधील कलम ४३७–अ च्या पुर्ततेच्या अनुषंगाने आरोपी क्र.४ व ५ यांनी रक्कम रुपये १५,०००/– प्रत्येकी चा वैयक्तीक जातमुचलका द्यावयाचा आहे.

Digitally signed by MAHAVEER MOTICHAND GADIYA
Date: 2026.03.17 13:48:53 +0530

कोल्हापूर. **(एम. एम. गादिया)**

दिनांकः १६.०३.२०२६ मुख्य न्यायदंडाधिकारी, कोल्हापूर.

## केसचा सारांश

| | | |
|---|---|---|
| १. | गुन्हा घडलेली तारीख | १९.१२.२००२ ते २९.०९.२०१० |
| २. | प्रथम खबर | ३०.०९.२०१० |
| ३. | दोषारोप पत्र दाखल तारीख | १४.०५.२०१२ |
| ४. | दोषारोप तारीख | ३१.०७.२०१९ |
| ५. | पुरावा सुरु झालेची तारीख | ०९.०६.२०२३ |
| ६. | कोणत्या तारखेला निकालासाठी ठेवले | .. |
| ७. | निकाल तारीख | १६.०३.२०२६. |
| ८. | शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | नाही. |

## आरोपी विषयी माहिती

| अ. क्र. | आरोपींची नावे | अटक तारीख | जामीनावर सुटलेली तारीख | केलेले गुन्हे | निर्दोष किंवा शिक्षा | दिलेली शिक्षा | फौजदारी दंड संहितेच्या कलम ४२८ साठी खटल्यादरम्यान ताब्यात घेतलेला कालावधी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | माणिक लालचंद गांधी | .. | १८.०१.२०१८ | भारतीय दंड संहीता, १८६० मधील कलम १९३, ३४२, ४६७, ४६८, ४७१, ४२०, ३२३, ५०४, ५०६, ४०९, व ५११ सह कलम ३४ | निर्दोष मुक्तता | .... | .... |
| २ | मोहन लालचंद गांधी | .. | १७.०१.२०१८ | .....''.... | निर्दोष मुक्तता | .... | .... |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | विना माणिक गांधी | .. | १९.०१.२०१८ | .....''.... | निर्दोष मुक्तता | .... | .... |
| ४ | महेश बाळकृष्ण भाकरे | .. | १९.०१.२०१८ | .....''.... | निर्दोष मुक्तता | .... | .... |
| ५ | पुजा महेश भाकरे | .. | २६.०४.२०१८ | .....''.... | निर्दोष मुक्तता | .... | .... |
| ६ | सदानंद विलास बडवे | .. | १९.०१.२०१८ | .....''.... | निर्दोष मुक्तता | .... | .... |

## फिर्यादी/बचाव/ न्यायालयीन साक्षीदारांची यादी

**(अ) – अभियोग पक्षातर्फे साक्षी यादी –**

| अ.क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | प्रभात राजमल निंबजीया, | साक्षीदार नि.४९ |

(ब) – बचाव पक्षातर्फे साक्षीदार – निरंक

(क) – न्यायालया तर्फे साक्षीदार – निरंक

## फिर्यादी/बचाव/ न्यायालयीन निशाणी क्रमांक –

(अ) – अभियोग पक्षातर्फे निशाणी – निरंक

(ब) – बचाव पक्षातर्फे निशाणी – निरंक

(क) – न्यायालयातर्फे निशाणी – निरंक

(ड) – भौतिक वस्तू – निरंक

Digitally signed by MAHAVEER MOTICHAND GADIYA
Date: 2026.03.17 13:48:59 +0530

कोल्हापूर. **(एम. एम. गादिया)**

दिनांकः १६.०३.२०२६ मुख्य न्यायदंडाधिकारी, कोल्हापूर.